

सतिश लोखंडे
आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

## सुधारित अर्थसंकल्प सन २०१७-१८ सह सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत मा. आयुक्त यांची टिपणी

मा. स्थायी समिती सभापती व सन्माननिय सभागृह,

वसई विरार शहर महानगरपालिकेचा आयुक्त म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९५ अन्वये मी सन २०१७-१८ या वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे सुधारित अर्थसंकल्प व सन २०१८-१९ या वर्षाचे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करीत आहे. याच अधिनियमाचे कलम ९६ नुसार सदर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत सविस्तर विचार विमर्ष करुन अर्थसंकल्प मा. महासभेपुढे सादर करणेस मा. स्थायी समितीच्या शिफारशीसाठी सविनय सादर.

### अर्थसंकल्पीय गोषवारा

| वर्ष | प्रारंभिक शिल्लक | जमा रकमा | प्रारंभिक शिलकेसह एकूण | खर्च रकमा | अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| सन २०१४-१५ | रु. ५४९ कोटी ९० लक्ष | रु. ७६६ कोटी ७७ लक्ष | रु. १३१६ कोटी ६७ लक्ष | रु.९८८ कोटी ८४ लक्ष | रु. ३२७ कोटी ८३ लक्ष |
| सन २०१५-१६ | रु. ३२७ कोटी ८३ लक्ष | रु. ८६२ कोटी ७५ लक्ष | रु. ११९० कोटी ५८ लक्ष | रु. ८२३ कोटी ०८ लक्ष | रु. ३६७ कोटी ५० लक्ष |
| सन २०१६-१७ | रु. ३६७ कोटी ५० लक्ष | रु. ७४१ कोटी ७५ लक्ष | रु. ११०९ कोटी २५ लक्ष | रु. ७३२ कोटी ६४ लक्ष | रु. ३७६ कोटी ६१ लक्ष |
| सुधारीत अंदाज सन २०१७-१८ | रु. ३७६ कोटी ६१ लक्ष | रु. १३५९ कोटी ७४ लक्ष | रु. १७३६ कोटी ३५ लक्ष | रु. १५३७ कोटी २० लक्ष | रु. १९९ कोटी १५ लक्ष |
| मुळ अंदाज सन २०१८-१९ | रु. १९९ कोटी १५ लक्ष | रु. १६०५ कोटी ८९ लक्ष | रु. १८०५ कोटी ०४ लक्ष | रु. १६५५ कोटी ४३ लक्ष | रु. १४९ कोटी ६१ लक्ष |

अखेर शिल्लक रु. १४९ कोटी ६१ लक्ष दर्शवलेली आहे तथापी त्यापैकमी महसुली शिल्लक रु. १८ लक्ष ७० हजार आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका राज्यातील झपाटयाने वाढणारे नागरी क्षेत्र म्हणून गणले जाते. मुंबई लगतचे क्षेत्र आल्याने वसई विरार शहराकडे तिसरी मुंबई म्हणून ओळख्र निर्माण झाली आहे. वाढती लोकसंख्या आणि झपाटयाने होणारे नागरीकरण याचा ताण शहराच्या पायाभूत सुविधांवर वाढत चालला आहे. त्याच प्रमाणे नागरीकांच्या महानगरपालिकेकडून नागरीसुविधाच्या अपेक्षा मोठया प्रमाणात वाढल्या आहेत. अंदाजपत्रक सादर करीत असतांना ते वास्तववादी संरचनात्मक दृष्टीने परिपूर्ण लेख्रासिध्दांतानुसार वर्गीकरण व परिणाम कारक करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केलेला आहे.

वसई विरार शहराच्या वाढणाऱ्या नागरी समस्यांचा विचार करता त्या सोडवण्याच्या दृष्टीने उपाययोजनांसाठी मोठया प्रमाणावर निधींची आवश्यकता आहे आणि तो निधी उपलब्ध होण्याकरीता फक्त महानगरपालिकेचा निधी किंवा शासकिय अनुदाने यांचाच विचार न करता पी.पी.पी. योजनेतून प्रकल्प हाती घेणेत येत आहेत तसेच बँकेमार्फत सी.एस.आर निधी मधून काही योजना हाती घेतल्या असुन यापुढेही काही प्रकल्प हाती घेण्याचा मानस आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या महसूली उत्पन्न व दायित्व पहाता अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करतांना किमान नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे हे मोठे आव्हान असून महसूली उत्पन्नावर भर देऊन ते पुर्ण करावे लागणार आहे. यासाठी शहरातील सर्व घटकांचे सक्रिय सकारात्मक सहकार्य अपेक्षित आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सुनियोजित विकासाबाबत मी बांधिल आहे.

# महानगरपालिकेचे प्रमुख्र उत्पन्न स्त्रोत

१ **मालमत्ता कर उत्पन्न** :- मालमत्ता कर , शास्ती, नोटीस फी, व्याज, शिक्षण कर रिबेट व रोजगार हमी कर रिबेट इत्यादी पासुन सन २०१७-१८ मध्ये अपेक्षित उत्पन्न हे रु. १९२ कोटी ११ लक्ष १५ हजार. तसेच सन २०१८-१९ मध्ये रु २३० कोटी ०८ लक्ष १५ हजार उत्पन्न अपेक्षित आहे. यामध्ये कर आकारणीपात्र सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण, स्वयंमुल्य निर्धारणाद्वारे आकारणी व तत्कालीन ग्रामपंचायत क्षेत्रातील मालमत्तांच्या सामान्य करामध्ये टप्प्या - टप्प्याने समानीकरण करणे यापासूनच्या वाढीव उत्पानाचा समावेश आहे.

२ **स्थानिक संस्थाकर / वस्तु** :- स्थानिक संस्था कराबाबत कर दात्यांनी दाखल केलेली विवरणपत्र पडताळणी करुन थकीत उत्पन्न प्राप्त करुन घेणेची कार्यवाही सुरु असुन

| | | | |
|---|---|---|---|
| | **व सेवा कर उत्पन्न** | | याद्वारे सन २०१७-१८ मध्ये ३८ कोटी व सन २०१८-१९ मध्ये रु. २० कोटी उत्पन्न अपेक्षित आहे.<br>* सद्यस्थितीत सदर कराऐवजी शासनामार्फत वसुल केल्या जात असलेल्या वस्तु आणि सेवा कराचे महसुलातून महानगरपालिकेस अनुदान दिले जात असुन याद्वारे सन २०१७-१८ मध्ये २९७ कोटी व सन २०१८-१९ मध्ये रु. ३५७ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे |
| ३ | **जाहिरात परवाना फी व जागा भाडे उत्पन्न** | :- | सन २०१७-१८ मध्ये जाहिरात कर व जागा भाडे प्रचलित पद्धतीनुसारचे उत्पन्न रु. ४० लक्ष अपेक्षित असुन महानगरपालिकेच्या जाहिरात विषयक धोरणानुसार जागा भाडे व कर आकारणीसाठी अभिकर्ता नियुक्तीस मंजूरी देण्यात आली असल्याने तद्नुसार ६ वर्षाकरीता किमान रु. २ कोटी ४० लक्ष अधिक वाढीव परवाना फी मधील हिस्सा असा ठेका देण्यात आला आहे. याद्वारे सन २०१८-१९ मध्ये रु. ९० लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित आहे. |
| ४ | **विशेष अधिनियमांखालील वसुली** | :- | नगररचना विभागामार्फत नियमीत प्रकरणांचे छाननी शुल्क, विकास शुल्क, प्रिमियम, टि.डी.आर. प्रिमियम, पुनर्वैधिकरण याबाबींपासून सन २०१७-१८ मध्ये रु. १३१ कोटी ६० लक्ष व सन २०१८-१९ मध्ये रु. १४७ कोटी ९५ लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित आहे.<br>याशिवाय बांधकाम परवानगी प्रमाणे बांधकाम न केलेल्या प्रकरणांमध्ये दंड लावून नियमाप्रमाणे बांधकाम नियमित करणे, परवानगी न घेता केलेले बांधकाम नियमीत करणे इत्यादी संदर्भाने धोरणात्मक निर्णय झाला असुन महानगरपालिका क्षेत्रातील अशा प्रकारच्या बांधकामांची संख्या व बांधकामे नियमीत करुन घेणेची आवश्यकता विचारात घेता याद्वारे सन २०१७-१८ मध्ये रु. ५० लक्ष व सन २०१८-१९ मध्ये रु. १८४ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे.<br>महानगरपालिकेच्या परिक्षेत्रातील २१ गावांसाठी देखील वसई विरार शहर महागनरपालिकेस नियोजन व विकास प्राधिकरणाचे अधिकार प्राप्त झाले मुळे सन २०१७-१८ मध्ये रु. ३८ लक्ष २५ हजार उत्पन्न अपेक्षित आहे. तसेच सन २०१८-१९ मध्ये रु. ३८ लक्ष २५ हजार उत्पन्न अपेक्षित आहे.<br>वरीलप्रमाणे नगररचना विभागाचे सन २०१७-१८ चे उत्पन्न रु. १३२ कोटी ४८ लक्ष २५ हजार व सन २०१८-१९ मध्ये रु. ३३२ कोटी ३३ लक्ष २५ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| **५** | **अग्निशमन सेवा उत्पन्न** | **:-** | अग्निशमन सुरक्षा व विशेष अग्निसंरक्षण फी (कॅपीटेशन फी), बांधकाम परवानगी देताना विकासकाकडून वसुल केली जात असुन विशेष अग्निशमन उपकर सामान्य करासोबत वसुल केला जात आहे. प्रत्यक्ष अग्निशमन सेवा महानगरपालिका क्षेत्रात मोफत असुन महानगरपालिकेच्या क्षेत्राबाहेर अग्निशमन सेवा पुरविण्यासाठी अग्निशमन फी आकारली जात आहे. अग्निशमन व्यवस्थेसाठी सन २०१७-१८ मध्ये रु. २० कोटी ४४ लक्ष ८० हजार इतकी रक्कम म्हाडा कडून प्राप्त झाली आहे. यासह सदर सेवेपासून सन २०१७-१८ मध्ये रु. ४० कोटी ३५ लक्ष ८० हजार व सन २०१८-१९ मध्ये रु. १९ कोटी ९३ लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे. |
| **६** | **वैद्यकिय सेवा उत्पन्न** | **:-** | वैद्यकिय सेवेसाठी सवलतीच्या दराने वसुल केल्या जाणाऱ्या विविध सेवा शुल्काद्वारे सन २०१७-१८ मध्ये रु. १ कोटी ७९ लक्ष २५ हजार व सन २०१८-१९ मध्ये रु. २ कोटी ०४ लक्ष ७५ हजार इतक्या जमा रकमा अपेक्षित आहेत. |
| **७** | **स्वच्छता कर उत्पन्न** | **:-** | मालमत्तेवरील सामान्य करासह आकारणी करुन वसुल केल्या जाणाऱ्या विशेष स्वच्छता करापासून सन २०१७-१८-१९ मध्ये प्रतिवर्षी रु. १९ कोटी २५ लक्ष उत्पन्न अपेक्षित असुन मल नि:सारण जोडणी खर्च वसुलीपोटी सन २०१७-१८-१९ मध्ये प्रतिवर्षी रु. ११ कोटी जमा रकमा अपेक्षित आहेत. यासह घनकचरा व्यवस्थापनासाठी शासकिय अनुदान, बाजार फी चे उत्पन्न इत्यादी बाबींपासून स्वच्छता सेवेसाठी सन २०१७-१८ मध्ये रु. ४२ कोटी ५३ लक्ष ०४ हजार व सन २०१८-१९ मध्ये रु. ४३ कोटी ३० लक्ष ०५ हजार उत्पन्न अपेक्षित आहे. |
| **८** | **पाणीपुरवठा सेवा उत्पन्न** | **:-** | विशेष पाणी पट्टी द्वारे सन २०१७-१८ मध्ये रु. ६२ कोटी व सन २०१८-१९ मध्ये ७१ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. बांधकाम परवानगी देताना विकासकाकडून वसुल केल्या जाणाऱ्या पाणीपुरवठा स्त्रोत विकास शुल्कापासून सन २०१७-१८-१९ मध्ये प्रतिवर्षी रु. १०० कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत सन २०१७-१८-१९ मध्ये प्रतिवर्षी रु. ३४ कोटी अनुदान अपेक्षित आहे.<br>अमृत योजनेअंतर्गत पाणीपुरवठा सन १७-१८ मध्ये रु. २८ कोटी २४ लक्ष २० हजार प्राप्त झाले असुन सन २०१८-१९ मध्ये रु. २७ कोटी ७८ लक्ष ५० हजार इतके अनुदान अपेक्षित आहे. याशिवाय नळ जोडणी फी रस्ता खोदाई शुल्क इत्यादी उत्पन्न बाबी आहेत.<br>पाणी पुरवठा सेवेसाठी सन २०१७-१८ मध्ये रु. २२६ कोटी ०८ लक्ष ३३ हजार व सन २०१८-१९ मध्ये रु. २३४ कोटी ७० लक्ष ३५ हजार उत्पन्न अपेक्षित आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | **अनुदाने उत्पन्न** | :- | यापुर्वी नमुद केल्या प्रमाणे वस्तु आणि सेवा कराचे महसुलातून शासनामार्फत दिले जाणारे अनुदान, अग्निशमन सेवेसाठी म्हाडाकडून प्राप्त झालेली रक्कम, घनकचरा व्यवस्थापनासाठीचे अनुदान, पाणीपुरवठा योजनेसाठीचे अनुदान याव्यतिरीक्त<br>अमृत योजनेअंतर्गत बगीचा योजनेसाठी अनुदान, मुद्रांक शुल्क अनुदान रस्ते दुरुस्तीसाठी अनुदान स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत मा. खासदार व मा. आमदार निधी अनुदान, आपत्ती व्यवस्थापन अनुदान, एकात्मीक तलाव संवर्धन अनुदान, भुयारी गटार व सॅनिटरी लॅन्डफिलसाठी सॅटेलाईट सिटी / अमृत योजना अनुदान, वाचनालय अनुदान, कत्तलखाना निर्मीतीसाठी अनुदान, अल्पसंख्यांक बहुल क्षेत्र विकास अनुदान, मत्स्य विकास महामंडळाकडील मार्केट बांधकामासाठी अनुदान, दलित वस्ती सुधारणा अनुदान अशा विविध स्वरुपाच्या अनुदानापोटी सन २०१७-१८ मध्ये रु. ४७१ कोटी ७० लक्ष व सन २०१८-१९ रु. ४९९ कोटी ९९ लक्ष इतके अनुदान अपेक्षित आहे. |
| १० | **इतर उत्पन्न** | :- | महानगरपालिकेच्या जे.सी.बी. रोडरोलर, कॉम्पॅक्टर इत्यादी वाहनाचे भाडे प्रतिवर्षी रु. ५ कोटी, रस्ता खोदाई शुल्क प्रतिवर्षी रु. ३ कोटी ५० लक्ष अपेक्षित असुन इतर उत्पनामध्ये समाविशष्ट प्रयोग / खेळावरील कर, पे & पार्क वाहनतळ व्यवस्था, नो पार्किंग मधील वाहने उचलणे, अतिक्रमण हटविणे व अनधिकृत बांधकाम तोडणे व प्रशासकिय शुल्क, जुन्या भांडाराच्या विक्रीचे उत्पन्न, निविदा इतर नगरपालिका प्रकाशनांचे उत्पन्न, रुग्णालय व इतर आस्थापनांच्या नोंदणीसाठी नाहरकत दाखला व दाखला नुतणीकरण फी, जन्म - मृत्य दाखला, विवाह नोदंणी फी इत्यादी बाबींपासून सन २०१७-१८ मध्ये २० कोटी १५ लक्ष ३० हजार व सन २०१८-१९ मध्ये रु. १९ कोटी ९३ लक्ष ३० हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे. |
| ११ | **वाचनालय सेवा उत्पन्न** | :- | वाचनालय सेवेपासून सन २०१७-१८-१९ मध्ये प्रतिवर्षी रु. १५ लक्ष १५ हजार उत्पन्न अपेक्षित आहे. |
| १२ | **तलाव व्यवस्था उत्पन्न** | :- | तलाव व्यवस्थेपासून फी चे उत्पन्न सन २०१७-१८-१९ मध्ये प्रतिवर्षी रु. २ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. |
| १३ | इमारत व गाळा भुईभाडे व सांस्कृतीक भवन उत्पन्न | :- | महानगरपालिकेच्या इमारती व इतर स्थावर मालमत्तांच्या भाड्यापासूनचे उत्पन्न सन २०१७-१८-१९ मध्ये प्रतिवर्षी रु. ६१ लक्ष ५५ हजार उत्पन्न अपेक्षित असुन सांस्कृतीक भवन व्यवस्थेपासून सन २०१७-१८-१९ मध्ये प्रतिवर्षी रु. ३ लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे. |

## ❖ ठळक खर्च बाबी ❖

**१) आस्थापना खर्च :-**

महानगरपिालकेच्या विस्तीर्ण कार्यकक्षेचा विचार करता आवश्यक सुविधा पुरवणेसाठी झोन निहाय साफसफाई ठेक्यासह प्रशासकीय, तांत्रिक, नियोजन, विकास, अग्निशमन, पाणीपुरवठा, आरोग्य, वैद्यकिय आरोग्य, दिवाबत्ती, वाचनालय, शिक्षण, कर वसुली इ. जवळपास सर्व कामांसाठी आवश्यकतेनुसार स्वतंत्रपणे अभिकर्ता नेमून सेवा पुरवणेची तरतुद आहे. सद्यस्थितीत ठेका कर्मचाऱ्यांसाठी करावा लागणारा कर भारासह इतर खर्च विचारात घेता नविन पदे भरणे फायद्याचे असल्याने महानगरपालिकेच्या स्थायी आस्थापनेवरील आकृतीबंधानुसार रिक्त असलेली पदे आवश्यकतेनुसार भरली जाणार आहेत.

कार्यालयासाठी झेरॉक्स मशिन, फर्निचर, कॉपी प्रिंटर खरेदी, कार्यालयीन कामाचे आय. एस. ओ. प्रमाणपत्र मिळवणे, **अभिलेख कक्ष निर्माण करुन संगणकीय पद्धतीने अभिलेख व्यवस्थापन करणे,** बायोमॅट्रीक आयडेंन्टीफिकेशन व क्लोज सर्किट कॅमेरे व्यवस्था यासाठी आवश्यक खर्चाच्या तरतुदी आहेत. इतर प्रशासकिय खर्चासह आस्थापना खर्च खालीलप्रमाणे आहे.

| लेखाशिर्ष | तरतुद (रु. लाखात) | |
|---|---|---|
| | सन २०१७-१८ | सन २०१८-१९ |
| स्थायी आस्थापना वेतन व भत्ते | ४५६५.९८ | ४९७३.४७ |
| रोजंदारी आस्थापना वेतन व भत्ते | ३०.०० | २३.०० |
| साफसफाई व्यतिरिक्त कर्मचारी पुरवणेचा ठेका | ६६२४.३९ | ६३५४.५१ |
| कर्मचाऱ्यांसाठीचे इतर लाभ | २१०६.१२ | २६०४.५७ |
| इतर प्रशासकिय खर्च | ८८०.५५ | १०६९.०७ |
| महानगरपालिका सदस्यांसाठीचा खर्च | २७०.८० | २७०.८० |
| **एकूण** | **१४४७७.८४** | **१५२९५.४२** |

२ **नगर रचना** :- सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात केंद्र शासनाच्या ऑनलाईन इमारती बांधकाम परवाना योजने अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेची निवड झालेली आहे. सबब याकामी ऑटो डी.सी.आर प्रोग्राम तयार करणे व त्या संबंधित कामे एजन्सी मार्फत करावयाची प्रक्रिया लवकरच करण्यांत येणार आहे. जी. आय. एस. मॅपींग / लॅण्ड युज अपडेशन, ऑटो डी. सी. आर, सि. आर. झेड. सर्व्हे, आकस्मिक खर्च इत्यादी बाबींसाठी सन २०१७-१८ मध्ये रु. २ कोटी १० लक्ष १० हजार व सन २०१८-१९ मधे रु. ०४ कोटी ०८ लक्ष इतकी तरतूद आहे.

३ **पथदिप व विद्युत व्यवस्था** :- शहरातील पथदिप व्यवस्थापन, अपारंपारीक ऊर्जास्त्रोत निर्मिती, विद्युत देयक, विद्युत मंडळाचे चार्जेस, पोल स्थलांतर, नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था/ टायमर व्यवस्था, रोहित्र खरेदी, दिवाबत्ती विभागासाठी वाहन खरेदी इत्यादी खर्चासाठी सन २०१७-१८ मध्ये रु. २९ कोटी ४६ लक्ष ११ हजार व सन २०१८-१९ मधे रु. २५ कोटी ५२ लक्ष ११ हजार इतकी तरतूद आहे. **सद्याचे दिवे आवश्यकतेनुसार दुरुस्ती देखभालीच्या वेळी अथवा टप्याटप्याने बदलून एल ई डी व्यवस्था अंमलात आणण्याचा प्रस्ताव असून यामुळे भविष्यातील महसुली खर्चात २८ ते ३०% खर्च कपात अपेक्षित आहे**

४ **अग्निशमन व्यवस्था** :- महानगरपालिकेकडे एक अतिअद्यावत मुख्य अग्निशमन केंद्र, दोन अद्यावत उप अग्निशमन केंद्र व तीन साधारण अग्निशमन केंद्र आहेत. त्याद्वारे मनपा क्षेत्र तसेच लगतचे क्षेत्रामध्ये अग्निशमन व बचावकार्य करण्यांत येते.

महानगरपालिकेच्या मालमत्तांचे फायर ऑडीट करणे व तद्नुसार उपाययोजना करणे यासह अग्निशमन वाहन, अग्निशमन यंत्रणा असलेली मोटर सायकल, हॅजमॅट व्हॅन व फायर बलुन उपलब्ध करणे, रिमोटने अपडेट करणारे वॉटर टॉवर, ७० मी. उंच शिडीसह अत्याधुनिक अग्निशमन यंत्रणेसाठी व शहरातील विविध ठिकाणी अग्निशमन उपकेंद्रे निर्मितीसाठी सन २०१७-१८ मध्ये रु. ३४ कोटी ५३ लक्ष ५५ हजार व सन २०१८-१९ मधे रु. ५१ कोटी ५४ लक्ष २५ हजार इतकी तरतूद आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | **शहर स्वच्छता** | **:-** | वसई विरार शहर महानगरपालिका शहर स्वच्छता विभागामार्फत विविध योजना प्रभावी पणे राबविल्या जात असून यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान योजना, **शास्त्रोक्त पद्धतीने एकात्मीक डास निर्मुलन कार्यक्रम,** स्वच्छता विषयक जनजागृती, नाले सफाई, डंपिंग ग्राऊंड व्यवस्था, सॅनीटरी लॅडफील व्दारे कचऱ्याची विल्हेवाट लावणे, मालमत्तांच्या व्हेंट पाईपवर जाळी बसवणे, शुन्य कचरा अभियानांतगत सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर ५०० मीटर क्षेत्रासाठी एक कामगार २ पाळ्यामध्ये नियमीत उपलब्ध करणे यासह शहर स्वच्छता विभागास आवश्यक सर्व इतर खर्चासाठी तरतूदी उपलब्ध आहेत. सॅटेलाईट सिटी योजनेंतर्गत प्राप्त अनुदान निधीतून प्रभावी कॉम्पॅक्टर व इतर कचरा वाहतूक वाहने उपलब्ध झाली असुन ती याकामी संबंधीत ठेकेदारास उपलब्ध करुन दिली असल्याने याबाबतचा खर्च समायोजित होण्यास मदत झाली आहे. शहर स्वच्छतेकरीता सन २०१७-१८ रु. १७३ कोटी २८ लक्ष ७९ हजार व सन २०१८-१९ रु. १६८ कोटी ९० लक्ष ९८ हजार तरतुद आहे. |
| ६ | **श्वान निर्बिजीकरण** | **:-** | मादी श्वान निर्बिजीकरण शेड बांधकामासह मोकाट मादी श्वानांचे निर्बिजिकरणेकामी नविन केंन्द्र प्रस्तापित करणेकामी सन २०१७-१८ मध्ये रु. ७० लक्ष व सन २०१८-१९ मधे रु. ५० लक्ष इतकी तरतूद आहे. |
| ७ | **रुग्णालयीन सेवा (वैद्यकिय आरोग्य)** | **:-** | महापालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये सध्या सर डी. एम. पेटीट रुग्णालय, वसई, तुळींज रुग्णालय, माता बालसंगोपन केंद्र, सातिवली याशिवाय एकवीस नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व आठ दवाखाने यामार्फत रुग्णालय सेवा उपलब्ध केल्या आहेत. संपूर्ण रुग्णालयाचे आधुनिकीकरण करणेत आले असुन, महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी अधिक भर देण्यात आला असून तद्‌नुसार वाढीव तरतुदी प्रस्तावित आहेत. महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णांसाठी श्वानदंश व सर्पदंश इंजेक्शन मोफत देणे, अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या व्यक्तीसाठी समुपदेशन करुन उपचार करणे व जनजागृती करणे तसेच महानगरपालिकेच्या रुग्णालयात जेनेरीक मेडीसीन उपलब्ध करणेची तरतुद आहे. महानगरपालिकेचे कर मुदतीत भरणाऱ्यांना हेल्थ कार्ड उपलब्ध करुन देऊन महानगरपालिकेच्या रुग्णालयात रक्त तपासणी, इ.सी.जी., एक्सरे, इत्यादी, आवश्यक तपासणीसाठी सर्वसामान्यांना ५०% तसेच दिव्यांग व महिला व बालकांना १०० % सवलत देणेची तरतुद आहे. प्रसुती विभागातील रुग्णांना पोषण व आरोग्य भत्ता, मोफत रुग्णवाहिका सेवा, महानगरपालिका रुग्णालयात उपलब्ध असलेल्या सर्व |

वैद्यकिय चाचण्या मोफत करणे इत्यादी सुविधा उपलब्ध असून प्रसुती विभागातील सर्वच प्रकारच्या रुग्णालयीन सेवा सवलतीच्या दरात उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. दोन रुग्ण वाहिका बँकेमार्फत सी. एस. आर. मधून उपलब्ध झाल्या आहेत.

**जुचंद्र रुग्णालय बांधकाम, एन. आय. सी. यु. व आय. सी. यु. व्यवस्थेसह रुग्णालय बांधकाम, रुग्णालयासाठी एस. टी. पी. व्यवस्था करणे प्रस्तावित आहे. पी. पी. पी. तत्वावर ट्रॉमा सेंटर उपलब्ध करणे यासाठी आवश्यक तरतुदी आहेत.**

एकूण रुग्णालय व्यवस्थापनासाठी सन २०१७-१८ मध्ये रु. २६ कोटी ८२ लक्ष ९२ हजार व सन २०१८-१९ मध्ये रु. ३३ कोटी ६२ लक्ष १० हजार इतकी तरतुद आहे.

८ **आपत्ती व्यवस्थापन :-** आपत्कालीन परिस्थितीत गरीब गरजूंना अर्थसहाय्य करणे तसेच आपत्कालीन कालावधीत विशेष सेवा पुरविणेसाठी उपाय योजना करणे, आपत्कालीन परिस्थितीत तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था करणेसाठी ट्रांझीट कॅम्प, आपत्कालीन परिस्थिती नियंत्रणासाठी पोलिस मदतीसह हेलिकॅप्टर भाडे, कृती आराखडा तयार करुन तद्नुसार आवश्यक ती व्यवस्था करणेसाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करणे, सागरी किनारी सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करणे यासाठी व इतर आपत्कालीन व्यवस्थेसाठी सन २०१७-१८ मध्ये रु. ३३ लक्ष व सन २०१८-१९ मध्ये रु. कोटी २९ लक्ष इतकी तरतुद आहे. आपत्ती व्यवस्थापनांतर्गत अद्यावत आपत्ती निवारण केंद्र उभारणकामी सन २०१८-१९ मध्ये रु. ५ कोटी इतकी तरतुद आहे.

महापौर सहाय्यता निधी : महानगरपालिका निधीतून गरीब गरजूंना आर्थिक मदत करताना विशेष बंधनाशिवाय आर्थिक सहाय्य देता यावे हा या निधीचा प्रमुख उद्देश आहे. यासाठी सन २०१७-१८-१९ मध्ये प्रतिवर्षी रु. ५० लक्ष इतकी महानगरपालिका अनुदानाची तरतूद आहे.

९ **सर्व धर्मियांसाठी दहन व दफनभुमी व्यवस्था :-** महानगरपालिका क्षेत्रातील दहन भुमींमध्ये महानगरपालिका लगतचे क्षेत्रातील व्यक्तींचेदेखील अंत्यसंस्कार केले जात असुन अशा सर्व अंत्यसंस्कारासाठी देखील प्रेत दहनाकरीता लाकडे मोफत उपलब्ध करणे व दफन संस्कारासाठी रु. १ हजार ठोक अनुदान देणेची तरतुद आहे. महानगरपालिका क्षेत्रातील प्रमुख दहनभुमींचे ठिकाणी विद्युत व गॅस दाहिनी व्यवस्था मोफत उपलब्ध करुन देऊन पर्यावरण संरक्षण करणेसाठी प्रयत्न केले जात असून, विद्युत दाहिनी व गॅस दाहिनींचा वापर करणेस प्रवृत्त करणेस प्रत्येक अंत्यसंस्कारासाठी मयत व्यक्तीचे निकटतम गरीब

गरजू नातेवाईकास ठोक रु. १ हजार अर्थसहाय्य अंत्यसंस्काराच्या वेळी अथवा अतिशिघ्र घरपोच देणेची तरतुद आहे. पी.पी.पी. तत्वावर पालापाचोळ्यपासून ब्रिकेट्स तयार करुन पर्यावरण पुरक ब्रिकेट्सचा वापर करुन दहन व्यवस्था उपलब्ध करण्याची तरतुद आहे.

दहन भूमीचा इतर नागरिकांना होणारा त्रास विचारात घेऊन **एकात्मीक दहन भूमी विकास कार्यक्रमांतर्गत सुशोभिकरण** करुन सदर ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करणे, पुरेशा उंच संरक्षक भिंतीची व्यवस्था करणे, सर्व धर्मीयांसाठी भुसंपादनासह दफनभूमी विकसित करणे तसेच उपलब्ध दफन भूमींच्या विकास व सौदर्यीकरण इत्यांदीसाठी बांधकाम विभागांतर्गत वरील प्रमाणे दहन दफनभूमीच्या एकूण व्यवस्थेसाठी सन २०१७-१८ मध्ये रु. १३ कोटी १० लक्ष ६९ हजार व सन २०१८-१९ मध्ये रु. १७ कोटी ०८ लक्ष ३६ हजार इतकी तरतुद आहे.

१० **उद्यान व्यवस्था** :- महानगरपालिका क्षेत्रातील विविध उपलब्ध ठिकाणी अबाल वृध्दांसाठी उद्यान, सर्वसाधारण उद्यान, विज्ञान उद्यान, वनस्पती उद्यान, जॉगर्स पार्क इत्यादी विकसित करणे तसेच उद्यानामध्ये खेळणी, क्रिडा साहित्य, म्युझीकल सिस्टीम, इलेक्ट्रीक फिटींग, बैठक व्यवस्थेसाठी बाकडे, कारंजे व्यवस्था, खत निर्मीती प्रकल्प राबविणे, उद्यानात तुषार सिंचन/ठिबक सिंचन पध्दती बसविणे इत्यादी विविध उद्यान विषयक बाबींसाठी तरतुदी असून महिला सक्षमिकरणासाठी उद्यानांची देखभाल करणेचे काम महानगरपालिकेच्या महिला बाल कल्याण विभागात नोंदणी असलेल्या नोंदणीकृत असलेल्या महिला बचत गटांना देण्यांत आले आहे. याकामी सन २०१७-१८ मध्ये रु. २१ कोटी २४ लक्ष ९१ हजार व सन २०१८-१९ मध्ये रु. २६ कोटी २२ लक्ष ६६ हजार तरतुद आहे.

११ **सांस्कृतिक भवन व समाजमंदिर व्यवस्था** :- सांस्कृतिक भवन व समाजमंदिर व्यवस्थेसाठी सन २०१७-१८ मध्ये रु. ३८ लक्ष १५ हजार व सन २०१८-१९ मध्ये रु. ४५ लक्ष ३५ हजार इतकी तरतूद आहे.

१२ **मार्केट व्यवस्था** :- शहरात विविध ठिकाणी शितगृहाच्या व्यवस्थेसह ओले मासळी मार्केट मटन मार्केट, सुकी मासळी मार्केट, भाजी मार्केट, फुल मार्केट इत्यादी मार्केट व बहुउद्देशिय मंडईसह, **शक्य होईल तितक्या फेरीवाल्यांना मानवतावादी दृष्टीकोनातून अन्यत्र स्थलांतरीत करण्याच्या हेतूने**

**शहरातील विविध ५१ ठिकाणी छोटे - छोटे मार्केट विकसीत करणे,** यासाठी सन २०१७-१८ मध्ये रु. १ कोटी ७८ लक्ष १ हजार व सन २०१८-१९ मध्ये रु. ७ कोटी ३० लक्ष २५ हजार इतकी तरतूद आहे.

१३ **तलाव व्यवस्था** :- विरार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तलाव, ॲड. सि. पी. सोलंकी परिक्रमा व नौकाविहार केंद्र तसेच नालासोपारा येथील चक्रेश्वर तलाव, तामतलाव, आचोळा तलाव, नानभाट तलाव, बर्फेश्वर तलाव विकसित करण्यात आलेले असून एकात्मिक तलाव संवर्धन योजनेंतर्गत प्राप्त अनुदानातून निर्मळ येथील विमल तलाव येथे जॉगींग ट्रॅक, ग्रीन वॉल, ग्रीन हाऊस, धोबी घाट, विसर्जन घाट, सोलार पावर सिस्टीम लेझर शो, विरंगुळा केंद्र, माहि महोत्सवाच्या धर्तीवर म्युझीयम तयार करणे, **पापडखींड धरणाचे सौदर्यीकरण** यासह चेन ऑफ लेक नुसार पापडी तलाव, गांधी तलाव इ. शहरातील विविध तलावांचे पुनर्जिवीतीकरण व सुशोभिकरण करणे, निर्माल्य कलश व्यवस्था करणे इत्यादी कामी सन २०१७-१८ मध्ये रु. ३३ कोटी १५ लक्ष १ हजार व सन २०१७-१८ मधे रु. ४२ कोटी ५८ लक्ष १८ हजार इतकी तरतूद आहे.

१४ **बांधकाम व्यवस्था** :- बांधकामाच्या महसुली खर्च विषयक बाबी, दुरुस्ती विषयक बाबी, नविन कामे इ. साठी आवश्यक अर्थसंकल्पीय तरतूद आहेत. इमारत दुरुस्ती, रस्ते दुरुस्ती इतर बांधकामांची दुरस्ती देखभाल, रस्ते सौदर्यीकरण, कॅटआय रिफ्लेक्टर व्यवस्था, कामगार निवास दुरुस्ती, विशेष तांत्रिक कामांसाठी तांत्रिक सल्लागारामार्फत बांधकामचे नियोजन व अंदाजपत्रक तयार करुन नियंत्रण ठेवणे, भुमापन खर्च, संरक्षक भिंत बांधकाम दुरुस्ती, हुतात्मा स्मारके व ऐतिहासिक स्मारक देखभाल, **प्रशासकिय इमारत व कार्यालय आणि समिती सभागृहाचे बांधकाम व नुतनीकरण**, पुढील पाच वर्षाच्या दुरुस्ती देखभालीच्या जबाबदारीसह विविध ठिकाणी सिमेंटचे रस्ते, डांबरी रस्ते, नविन रस्त्यांसाठी खडीकरण, पदपथ व्यवस्था, गटार बांधकाम, भुमिगत गटार व्यवस्था, नाला व मोरी बांधकामे, गटारावर चेंबर्स व्यवस्था सार्वजनिक शौचालय व मुतारी बांधकामे, भुसंपादीत आरक्षित जागांचा विकास, **रात्र निवारा गृह उपलब्ध करणे,** बहुमजली पार्किंग योजना, क्रिडा संकुल बांधणे, महत्वाच्या ठिकाणी दिशादर्शक फलक व स्वागत कमानी, अल्पसंख्याक बहुल क्षेत्र विकासकामे, महापौर निधी अंतर्गत त्यांचे शिफारशी नुसार व प्रभाग समिती स्तरावर प्रभाग समिती निधीतील आवश्यक कामे, वैशिष्टयपूर्ण कामे व मुलभूत सुविधा विषयक कामासठी प्राप्त विशेष निधीतील कामे

करणे यासह मा. आमदार निधीतील कामांसह, मा. आमदार निधीतील कामे, बंदर विकास कामांतर्गत मच्छीमार / कोळी बांधवांसाठी व्यवस्थाय वृध्दीकरिता शितगृह व्यवस्था, बर्फ कारखाना, मासळी सुकवण्यासाठी चौथरा बांधकाम, जेट्टीच्या जोडरस्त्याचे कॉंक्रिटीकरण, उतरता धक्का बांधणे, धुप प्रतिबंधक बंधारे व समुद्र किनारी संरक्षक भिंती उभारणे इत्यादी विविध विकासकामांसाठी सन २०१७-१८ मध्ये रु. ४४५ कोटी १० लक्ष ३० हजार व २०१८-१९ मध्ये रु. ४३३ कोटी ७९ लक्ष ६३ हजार इतकी तरतूद आहे.

शहर उद्यान व दुभाजके सुशोभिकरण यासाठी उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाअंतर्गत तरतुदी असुन प्रथमत: ही कामे बँकेमार्फत सी. एस. आर. मधून करुन घेण्याचा प्रयत्न आहे, तसेच मत्स्यालय व भुगर्भ उद्यान बी.ओ.टी तत्वावर विकसीत करण्याचे प्रस्तावित आहे.

१५ **उड्डाणपूल व्यवस्था** :- महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी रस्ते उड्डाणपलू व्यवस्थेकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठपुरावा सुरु असुन यासाठी महानगरपालिका निधीतून शहरातर्गत उड्डाणपूल, पुर्व पश्चिम विभागास जोडणारे पुल, रेल्वे फाटक क्र.४१ वरील उड्डाणपुल यासाठी सन २०१८-१९ मध्ये रु. १ कोटी ४ लक्ष व सन २०१८-१९ मध्ये रु. १२ कोटी २ लक्ष इतकी तरतुद आहे.

१६ **शिक्षण व्यवस्था** :- अ) जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा ताब्यात घेणे, पुर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षण व्यवस्थापनासह माध्यमिक शिक्षणांतर्गत मराठी, हिंदी, गुजराथी व उर्दू माध्यमाच्या शाळांना महिला बाल कल्याण विभागाच्या योजनेच्या तरतुदीमधून सर्व शालेय विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त थंड पिण्याच्या पाण्याची यंत्रे, क्रीडासाहित्य, प्रयोग शाळेतील साहित्य, विद्युत जनित्र/इनव्हर्टर व्यवस्था इ. साधन सामुग्री पुरविणे या बाबींसाठी आवश्यक तरतूद, शाळागृह इमारतीची दुरुस्ती, जिल्हा परिषदेच्या शाळा प्रत्यक्ष महानगरपालिकेच्या ताब्यात येई पर्यंत प्राथमिक शिक्षण निधीची तरतूद तसेच देय प्राथमिक शिक्षण अंशदानाच्या तरतुदीमधून यापूर्वी अदा केलेली प्राथमिक शिक्षण निधीची रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कमेतून प्रत्यक्ष महानगरपालिकेमार्फत शालेय व्यवस्थापन इत्यादी बाबींसाठी सन २०१७-१८ मध्ये रु. ८ कोटी २९ लक्ष ५२ हजार व सन २०१८-१९ मध्ये रु. १३ कोटी ५ लक्ष ७२ हजार इतकी तरतुद आहे.

ब) प्राथमिक व माध्यमिक शालेय शिष्यवृत्ती परिक्षा व इतर स्पर्धा परिक्षांमध्ये विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या सर्वसाधारण प्रवर्गातील विद्यार्थ्यांना

प्रोत्साहनपर पारितोषिके देणेकामी सन २०१७-१८ मध्ये रु. १ लक्ष व सन २०१८-१९ मध्ये रु. ५ लक्ष इतकी स्वतंत्र तरतूद आहे.

मागासवर्गीय विद्यार्थी व सर्व प्रवर्गातील विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र तरतुदी मागासवर्गीय कल्याणकारी योजना व महिला बाल कल्याण योजनेअंतर्गत अन्यत्र नमुदप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | **वाचनालय व्यवस्था** | :- | विरार येथे बॅकेमार्फत सी.एस.आर. अंतर्गत सुरु केलेले अत्याधुनिक इ-ग्रंथालयाचे काम अंतिम टप्यात आले आहे. याशिवाय शहरपातळीवर विविध ठिकाणी वाचनालय व अभ्यासिका व्यवस्था उपलब्ध करणे, पुर्वीच्या शहरी भागातील वाचनालयांचा दर्जा सुधारणे, योजनांतर्गत वित्तीय सहाय्य, महानगरपालिका क्षेत्रातील ग्रंथलयांना अनुदान देणे, वाचनालय व अभ्यासिका वर्षभर १२ तास सुरु ठेवणे, वाचनालय व अभ्यासिकेसाठी शुध्द व थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, वाळवी प्रतिबंधक किटकनाशके फवारणी करुन व पुस्तके बांधणी करुन पुस्तकांचे जतन करणे, **केंन्द्रीय ठिकाणी इ-ग्रंथालय व मध्यवर्ती ठिकाणी शहर वाचनालय सुरु करणे** इत्यादी बाबींसाठी सन २०१७-१८ मध्ये रु. ४५ लक्ष ३५ हजार व २०१८-१९ मध्ये रु. ७५ लक्ष ८ हजार इतकी तरतूद आहे. |
| १८ | **माहिती तंत्रज्ञान** | :- | ई - गव्हर्नन्स अंमलबजावणी करणेत आली असुन महानगरपालिकेची अद्यावत वेबसाईट, ऑनलाईन कर भरणा, राईट टु सर्विस या योजनेअंतर्गत दाखले ऑनलाईन पद्धतीने देणे, ई - निविदा कार्यवाही, जन्म - मृत्यू नोंदणी, टपाल नोंदणी, रुग्णालयासाठी संगणक आज्ञावली तयार करणे इ. संगणकीय सेवा देणेचे काम सुरु झाले आहे. संगणक प्रणाली/आज्ञावली विकसीत करणेत आली आहे. स्वतंत्र संगणकीय व्यवस्थापन केंद्र निर्माण केले जाणार आहे. महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांचे GEO-Tagging करण्याचे प्रस्तावित आहे. सदर व्यवस्थेसाठी सन २०१७-१८ मध्ये रु. ५ कोटी ६१ लक्ष ११ हजार व सन २०१८-१९ मध्ये रु. ७ कोटी ८२ लक्ष ११ हजार इतकी तरतुद आहे. |
| १९ | **सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम** | :- | स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, शिवजयंती, महात्मा गांधी जयंती व सावित्रीबाई फुले इतर थोर राष्ट्रपुरुषांच्या जयंती इत्यादी कार्यक्रमासह व्याख्यानमाला व वकृत्व स्पर्धा, ग्रंथ संमेलन इत्यादी साठी सन २०१७-१८ मध्ये रु. १८ कोटी १४ लक्ष ३० हजार व २०१८-१९ मधे रु. २२ कोटी ६० लक्ष २५ हजार इतकी तरतूद आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | **युवकांसाठी विशेष कार्यक्रम** | :- | स्पर्धात्मक युगातील यशस्वीततेसाठी युवक व युवतींकरिता विशेष शैक्षणिक कार्यक्रम, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन व दहावीच्या विद्यार्थांसाठी वाचनमाला उपलब्ध करणे, माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेतील विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या पहिल्या १० विद्यार्थ्यांना पारितोषीक व शिष्यवृत्ती देणे, तसेच शासनमान्य राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवरील परिक्षा व स्पर्धा परिक्षामध्ये पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य, शालेय विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप व सामुदायीक विवाह सोहळ्यांतर्गत वर अथवा वराचे पालकांना अनुदान याकामी सन २०१७-१८ व २०१८-१९ मधे प्रतिवर्षी रु. २ कोटी इतकी तरतूद आहे.<br>मागासवर्गीय विध्यार्थ्यांसाठी व मुलींसाठी शिष्यवृत्ती व पारितोषीकाची तरतुद स्वतंत्र राखीव तरतूदीअंतर्गत आहे. |
| २१ | **क्रिडा विषयक कार्यक्रम** | :- | (i) प्रभाग समिती निहाय शालेय कलाक्रीडा महोत्सवासाठी सन २०१७-१८ मध्ये रु. २ कोटी ७० लक्ष व सन २०१८-१९ मधे रु. २ कोटी इतकी तरतूद आहे.<br>(ii) महापौर मॅरेथॉन स्पर्धेस मिळालेला प्रतिसाद, यशस्वीतता व प्रत्यक्ष खर्चाचा विचार करुन मागील थकीत देयकासह सन २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये प्रतिवर्षी रु. २ कोटी इतकी तरतूद आहे.<br>(iii) खेळ व संघ दत्तक घेणे, महिला खेळाडू, बालके, युवक व वरिष्ठ नागरीक यांच्या क्रीडा विषयक विकासासाठी विशेष निधी उपलब्ध करणे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर शासन मान्य स्पर्धांसाठी शालेय विद्यार्थ्यांचे क्रीडासंघ पाठवणेसाठी प्रायोजकत्व स्विकारणे, यासाठी महानगरपालिकेची क्रीडासमिती नियुक्त करुन खेळाडू, प्रशिक्षक व संघ सदस्यांना लागणारे क्रीडा साहित्य गणवेश / टी शर्ट, प्रवास खर्च व इतर अनुषांगीक खर्चासाठी अर्थसहाय्य मंजुर करणे, भारतीय ऑलिंपिक संघटना, सर्व खेळांच्या अधिकृत राष्ट्रीय क्रीडा संघटना व सर्व खेळांच्या अधिकृत राज्य संघटनांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय अजिंक्य पदाच्या क्रीडा स्पर्धा व राष्ट्रीय अजिंक्य पदाच्या शालेय क्रीडा स्पर्धा यामधील रौप्य, कांस्य व सुवर्ण पदके मिळवणाऱ्या स्पर्धकांना क्रीडासाधना, क्रीडा संजिवनी योजनेअंतर्गत रु. १० हजार त रु. १ कोटी पर्यंतची बक्षिसे देणे |

व त्यांचा गौरव करणे, नवघर येथे वातानुकूलीत व्यायामशाळा व रायफल शुटींग प्रशिक्षण सुरु करणेसह वर्ल्ड कप, ऑलिंम्पीक, एशियाड, राष्ट्रकुल, राष्ट्रीय व इतर तत्सम स्पर्धांमध्ये निवड झालेल्या खेळाडूंना प्रोत्साहन पर रक्कम प्राथमिक खर्चासाठी मदत स्वरुपात अदा करणे तसेच शासनमान्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, ऑलींम्पीक स्पर्धा यामध्ये सहभाग घेणेसाठी निवड झालेल्या खेळाडू व संघांना अर्थसहाय्य करणे इत्यादी कामी सन २०१७-१८ मध्ये रु. ५० लक्ष व सन २०१८-१९ मधे रु. १ कोटी इतकी तरतुद आहे.

(iv) क्रीडा प्रबोधिनी व क्रीडा व्यवस्थापनासाठी सन २०१७-१८ मध्ये रु. ५ लक्ष व २०१८-१९ मध्ये रु. २० लक्ष इतकी तरतुद आहे.

नविन क्रीडागंणासाठी स्टेडियम बांधकाम व म्हाडा मैदान येथे अद्यावत क्रिडा संकूलासह इतर क्रीडांगण विषयक कामांसाठी सन २०१७-१८ मध्ये रु. ६ कोटी ८० लक्ष व सन २०१८-१९ मधे रु. ३२ कोटी इतकी तरतूद आहे.

क्रीडा विषयक कार्यक्रमांसाठी सन २०१७-१८ मध्ये रु. १५ कोटी १६ लक्ष ५१ हजार व २०१८-१९ मधे रु. ४० कोटी ८५ लक्ष इतकी तरतूद आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | **विविध संस्थांना विशेष योजनांतर्गत वित्तीय सहाय्य** | :- | विश्वस्त नोंदणीकृत रुग्णालय, निराधार व निराश्रीत मुली व महिलांसाठी कार्य करणाऱ्या संस्था व इतर संस्थाचा सामाजिक विकासातील अमुल्य सहभाग विचारात घेता अशा संस्थाना त्यांचे विशेष कार्यासाठी प्रोत्साहन देणेकामी योजनांतर्गत वित्तीय सहाय्य देणे तद्वतच विविध वर्गाच्या ग्रंथालयांना नियमीत तसेच जेष्ठ नागरीक व विद्यार्थ्यांना विनाशुल्क सेवा उपलब्ध करुन देणाऱ्या ग्रंथालयासाठी विशेष दराने योजनांतर्गत वित्तीय सहाय्य देणेकामी सन २०१७-१८ मध्ये रु. १ कोटी सन २०१८-१९ मध्ये रु. २ कोटी २५ लक्ष इतकी तरतुद आहे. |
| २३ | **दिव्यांगांसाठी कल्याणकारी योजना** | :- | उपलब्ध स्कायवॉक व उड्डाणपुलांजवळ दिव्यांगांसाठी सरकते जिने व उव्दाहन, विविध महत्वाच्या सार्वजनिक ठिकाणी रॅम्पची व्यवस्था व इतर दिव्यांग कल्याणकारी योजनांच्या भांडवली खर्चासह दिव्यांग कल्याणासाठी कार्य करणाऱ्या बोळींज येथील दिव्यांग पुर्नवसन केंद्रासह इतर संस्थांना अनुदान, विशेष बालकांसाठी महिला बाल कल्याण मध्ये असलेल्या तरतुदीव्यतीरीक्त दिव्यांग कल्याणकारी योजने अंतर्गत ३ चाकी सायकली तसेच इतर आवश्यक साहित्याचे वाटप, दिव्यांग अथवा त्यांचेवरील अवलंबीताच्या विवाहासाठी सामुदायीक विवाह सोहळ्या अंतर्गत |

अतिरीक्त अर्थसहाय्य, दिव्यांगत्वाचे आवश्यक दाखले मिळवून देण्यासाठी स्थानिक ठिकाणी विशेष शिबीरांचे आयोजन यासाठी सन २०१७-१८ मध्ये रु. ५ कोटी ९ लक्ष व २०१८-१९ मधे रु. ६ कोटी ६२ लक्ष इतकी तरतूद आहे.

| | | |
|---|---|---|
| २४ पाणी पुरवठा व्यवस्था | :- | सद्या आपल्या शहराला १३० एम. एल.डी. पाणीपुरवठा होत असुन नविन सुर्या प्रकल्पातून जवळपास १०० एम. एल. डी. पाणीपुरवठा होणार आहे. सदर योजनेत उद्‌भवलेल्या सर्व तांत्रिक अडचणी उदा. वनखात्याची परवानगी , खाजगी मालकीच्या जागा, अतिक्रमण इ. बाबी दुर झाल्या असुन काम अंतीम टप्प्यात आहे.<br>देहरजी धरणातून जवळपास ३०० एम. एल. डी. पाणीपुवठा होणार असू त्याचबरोबर पिंजाळ येथे ८ बंधारे, वैतरणा नदीवर ८ बंधारे, देहरजी नदीवर ६ बंधारे अशा २२ बंधाऱ्याद्वारे १०० एम.एल.डी. पाणी उपलब्ध होणार आहे.<br>२०० एम. एल. डी. पाणीपुरवठा करणारे सुसरी धरण शासनाकडून बांधणेत येणार असुन मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत राबविल्या जाणाऱ्या सुर्या योजनेतून १८५ एम. एल.डी. पाणीपुरवठा होणार आहे.<br>सातिवली, राजावली, कामण, खोलसापाडा, तिल्हेर, हत्तीपाडा, या प्रकल्पांचे सर्व्हेक्षण करणेसाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.<br>१८० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणीपुरवठा करणाऱ्या सुसरी धरणासाठी रु. १६ कोटी इतकी रक्कम महानगरपालिकेने भरणा केली असून सातिवली राजीवली धरण योजनेस साठवण तलाव बांधकाम करणेसाठी चाचणी निष्कर्ष अन्वेषण, संकल्पन व वनजमिनी प्रस्ताव तयार करुन मंजुरी इ. प्राथमिक खर्चाकरीता प्रत्येकी रु. १ कोटी प्रमाणे रु. २ कोटी इतका निधी महानगरपालिकेने प्रत्यक्ष भरणा केला आहे व देहरजा योजनेसाठी एन. पी. व्ही. भरणेसह इतर कामाकरीता रु. १६५ कोटी इतकी रक्कम भरणा केली आहे.<br>सुर्या नदी पात्रात ५ ठिकाण बंधारे बांधणे तसेच कवडास धरणाची उंची वाढवुन व गेट बांधून एकूण १०० दश लक्ष लिटर चा प्रकल्प राखुन ठेवणेसाठी प्रयत्न सुरु आहेत. यासाठी सर्व्हेक्षण व प्राथमिक खर्चासाठी रु. २० लक्ष इतका निधी महानगरपालिकेने भरणा केला आहे.<br>प्रति दिन २३ दश लक्ष लिटर पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकणारे राजीवली सातीवली धरण व प्रतिदिन ७० दश लक्ष लिटर पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकणारे कामण धरण, १२ दश लक्ष लिटर प्रतिदिन पाणीपुरवठा करणारे खोलसापाडा धरण तसेच धामणी व खडकवली धरणावरील |

योजनांचा पाठपुरावा करुन एकूण ४१५ दश लक्ष लिटर पाणीस्त्रोत उपलब्ध करणेसाठी प्रयत्न सुरु आहेत.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना, अमृत योजना व स्वनिधीसह एकूण पाणीपुरवठा सेवेसाठी सन २०१८-१९ मध्ये रु. २१२ कोटी ९९ लक्ष ४६ हजार इतकी तरतुद असुन सन २०१८-१९ मध्ये रु. २४८ कोटी ७९ लक्ष ६४ हजार इतकी तरतुद आहे.

**२५ नाले खोदाई** :- पावसाळी पाण्याचा निचरा योग्य पध्दतीने होऊन शहरामध्ये पाणी तुंबून राहू नये यासाठी नियमीत नाले सफाईसह पावसाळ्यापूर्वी यांत्रिक साहित्याव्दारे नाले खोंदाई करणेकामी सन २०१७-१८ रु. ५ कोटी ५० लक्ष व सन २०१८-१९ मध्ये ७ कोटी इतकी स्वतंत्र तरतुद आहे.

**२६ महिला बालकल्याण कार्यक्रम** :- बालवाडी तसेच प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपकरणे, वहया पुस्तके व खेळणी खरेदी, शाळांच्या आवश्यकतेनुसार संगणक पुरविणे, विशेष बालकांसाठी साहित्य पुरविणे व विशेष बालकांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान देणे, शालेय विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी मोफत शैक्षणिक पास योजना, नागरी गरीब विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी सायकली वाटप, शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम, नोकरदार महिलांसाठी वसतीगृह, निराधार महिलांसाठी तात्पुरता निवारा केंद्र व जेष्ठ महिलांसाठी वृध्दाश्रम निर्मीती व त्यांचेसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अर्थसहाय्य देणे, महिलांसाठी तिळगुळ व हळदीकुंकू कार्यक्रम, आरोग्य शिबीर व व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रम, नोकरदार व व्यवयाय करणाऱ्या महिलांच्या लहान मुलांचे संगोपन व त्यांची देखभाल करण्याच्या दृष्टीने पाळणाघर निर्मिती व सेवाभावी नोंदणीकृत महिला गटांना पाळणाघर चालविणेसाठी अनुदान देणे, कुटूंबकल्याण कार्यक्रम, कुपोषित माता व बालकांसाठी सकस आहार, बालकांच्या विकासासाठी अन्य कार्यक्रम, महानगरपालिका रुग्णालयातील प्रसुती विभागातील रुग्णांना पोषण व अल्पोपहार भत्ता, जननी शिशु सुरक्षा योजनेच्या लाभासह प्रसुत महिलांना रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर ₹ १६००/- इतका पोषण व आरोग्य भत्ता देणे, डायलेसिस उपचार स्वयंसेवी संस्थांमार्फत घेणाऱ्या मुली व महिलांना अनुदान देणे, मुली व मुलांना स्वयंसेवी संस्थांमार्फत दत्तक घेणाऱ्या पालकांना प्रोत्साहनात्मक अनुदान देणे, मुली व महिला यांचेकरीता तांत्रीक व व्यवसायीक प्रशिक्षण आयोजीत करणे, महिलांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजनासाठी सभागृह व व्यवसायासाठी गाळे असलेली महानगरपालिका मालकीची बहुउद्देशिय इमारत प्रभाग स्तरावर मोक्याच्या ठिकाणी उपलब्ध करुन देणे, एड्स ने मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या विधवा पत्नीस वैयक्तिक अर्थसहाय्य करणे, विधवा परितक्त्या महिलांच्या मुलींच्या विवाहासाठी ठोक अनुदान देणे, विधवा परितक्त्या

महिलांच्या मुलांच्या शिक्षणासाठी अर्थसहाय्य देणे. इयत्ता १ ली ते ४ थीच्या मुलांसाठी शैक्षणिक अर्थसहाय्य, इतर पदव्युत्तर शिक्षणाकरीता महिलांना अर्थसहाय्य, निराधार ज्येष्ठ महिलांना दर महा ठोक अर्थसहाय्य देणे. महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकिय तपासण्यासाठी महिला व बालकांना १००% सवलत देणे. महिलेच्या उत्पन्नावर अवलंबून असलेल्या कुटूंबातील कुटूंबप्रमुख अथवा अन्य सदस्य १००% अथवा ७५% अपंग असल्यास अशा कुटूंबातील महिलांना विशेष अर्थसहाय्य देणे, अशा व्यक्तींना सामुदायीक विवाह सोहळ्यातील वर - वधुसाठी निश्चित अनुदानाव्यतिरीक्त अतिरीक्त अर्थसहाय्य, विशेष बालकांच्या संगोपनासाठी पालकांना मासिक रु. १ हजार अनुदान, विधवा परितक्त्या महिलांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान देणे, महिला व मुलींसाठीच्या आश्रमांना अनुदान, अनाथ आश्रमांना अनुदान, महिला सक्षमिकरणासाठी विविध उपक्रम राबविणे, सामुदायीक विवाह सोहळ्या अंतर्गत वधु अथवा वधुचे पालकाला प्रत्येकी रु. १० हजार अनुदान देणे, बालचित्रपट महोत्सव, स्त्रीरोग चिकित्सा शिबीर, मुलींचे शाळा गळतीचे प्रमाण थांबवण्यासाठी प्रोत्साहन अनुदान, उत्कृष्ट कामाबद्दल महिलांचा गौरव,महिलांना त्यांचे कायदेशिर अधिकार व महिलांवरील अत्याचारांसबधी समुपदेशन करणे. तसेच महिला बालकल्याण समिती मार्फत आयोजीत केल्या जाणाऱ्या इतर योजना व कार्यक्रमांसाठी आणि महीला व बालकल्याण योजनेंतर्गत भांडवली कामे यासाठी सन २०१७-१८ मध्ये रु. १४ कोटी ९२ लक्ष ५० हजार व सन २०१८-१९ रु. १९ कोटी ६४ लक्ष इतकी तरतूद आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | **मागासवर्गीय कल्याणकारी योजना व पी बजेट** | :- | यामध्ये गरीब गरजूंसाठी मोफत वैद्यकिय शिबीर, समुह गटविमा योजनेखाली मेडिक्लेम सुविधा प्राप्त करुन देणे त्याचप्रमाणे अपघाती विमा रकमे इतके थेट संरक्षणाचा लाभ देणे, दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत अधिक अधिक अनुदान उपलब्ध करुन घेऊन सदर वसाहत सर्व सुविधायुक्त स्वच्छ व सुंदर करणे, दारिद्रिय रेषेखालील व्यक्तींसाठी घरकुल योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजनंतर्गत विकास कामे, विशेषतः नविन शहरी विभागात वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अनुदान देणे, कमी उत्पन्न गटातील शेतकऱ्यांसाठी, आपत्कालीन केंन्द्रासाठी सहाय्य करणारे दुर्बल घटकांतील मच्छीमार बांधवांसाठीच्या सोयी सुविधा तसेच इतर दुर्बल घटकांसाठी घ्यावयाच्या योजनांसाठी राखीव तरतूदीसह पी बजेट करीता सन २०१७-१८ मध्ये रु. २२ कोटी ५५ लक्ष व सन २०१८-१९ मध्ये रु. ३९ कोटी  ३८ लक्ष इतकी तरतूद आहे. |

आभार,

मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर सो, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर सो, मा. आमदार श्री. विलासजी तरे सो, माजी. खासदार श्री. बळीरामजी जाधव सो, मा. प्रथम महिला महापौर सौ. प्रविणाजी ठाकूर, मा. तत्कालीन उपमहापौर व सदस्य श्री. उमेशजी नाईक सो. वसई -विरार शहर माहनरगपालिकेचे मा. तत्कालीन स्थायी समिती सभापती श्री. नितीनजी राऊत सो, यांच्या वेळोवेळीच्या सुचनांप्रमाणे महानगरपालिकेच्या तयार करण्यात आलेल्या ‘ Vision Document’ मधील बाबींचा अंर्तभाव सदर अर्थसंकल्पात त्या-त्या घटकामध्ये केलेला आहे. तद्वतच विद्यमान मा. महापौर श्री. रुपेशजी जाधव सो. मा. विद्यमान उपमहापौर श्री. प्रकाशजी रॉड्रीग्ज सो. मा. विद्यमान स्थायी समिती सभापती. श्री. अफिफजी शेख सो. यांच्या वेळोवेळीच्या सुचना तसेच सन्मा. गटनेते व सन्मा. सदस्याकडून तसेच सर्व सन्मा. नागरीकांकडून देखील त्यांचे विचार व अपेक्षा आणि कल्पना जाणून घेण्याचा आम्ही वेळोवेळी प्रयत्न केला असुन त्याबाबीदेखील अर्थसंकल्पामध्ये विचारात घेतलेल्या आहेत.

सन २०१७-१८ च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन २०१८-१९ चे मुळ सर्वसाधारण अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक "अ", महानगरपालिकेच्या "अ" अंदाजपत्रकातील अंशदानासह पी बजेटचे अंदाज, जेण्डर बजेटचे अंदाज, अंध व अपंगाच्या कल्याणकारी योजनांसाठीच्या बजेटचे अंदाज, "ब" अंदाजपत्रकाकडे परिवहन सेवेकरीता वर्ग करावयाच्या अंशदानाचे अंदाज, जल मल प्रवाह निधी अंदाजपत्रक "क", वृक्ष निधी अंदाजपत्रक, एकत्रित पाणीपुरवठा व मल प्रवाह विनियोग कर्ज निधी अंदाजपत्रक, सॅटेलाईट सिटी / अमृत योजना इत्यादी विशेष निधीचे अंदाजपत्रक, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९५ (अ) नुसार, सन २०१६-१७ या कालावधीत अर्थसहाय्य देऊन पुरविलेल्या सेवांबाबतचा अहवाल व इतर आवश्यक सहपत्रे सोबत जोडली आहेत.

आपल्या क्षेत्रास नवी दिशा देण्याचा व तद्नुसार सुनियोजीत कामकाज करणेचा प्रयत्न करणेस सर्व मान्यवर पत्रकार, प्रसारमाध्यमे व वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातील तमाम जनतेने केलेल्या सहकार्याबद्दल मी अत्यंत आभारी आहे. असेच मौलीक सहकार्य व मार्गदर्शन कायम लाभेल या सदीच्छेसह सन २०१७-१८ चा सुधारीत व सन २०१८-१९ चा मुळ अर्थसंकल्प सविनय सादर.

धन्यवाद ! जय हिंद !!

दिनांक :- १७/०२/२०१८

सतिश लोखंडे
आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका